# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 30233447/475/422 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


जनरल अधिसुचना- II

क्रमांक : 2अ/एडीएम/जनरल अधिसुचना/2014/97
दिनांक : 15/01/2014

**विषय : शैक्षणिक वर्ष 2014-15 मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंबंधी...**

शैक्षणिक वर्ष 2014-15 मधील प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस/पीजीडीएम, एम फार्मसी , एमसीए व थेट द्वितीय वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षा घेऊन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने राज्यातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानीत पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेत मंजुर असलेल्या अभ्यासक्रमांचे विद्यापीठाचे संलग्नीकरणाचे (Affiliation) मूळ पत्र संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे पडताळणीकरिता सादर करावे. संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडुन प्राप्त अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरणाच्या यादीनुसारच तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या प्रवेश प्रक्रियेत सदर अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात येईल, याची सर्व संस्था चालक / प्रमुखांनी नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष 2014-15 मध्ये नव्याने मंजुर झालेले अभ्यासक्रम / प्रवेश क्षमतेत वाढ/ घट इ. बाबी विचारात घेऊन संबंधित अभ्यासक्रमांच्या सामायिक प्रवेश परीक्षा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होणार असल्या बाबतचे संबंधित संस्थेच्या ट्रस्टचे अध्यक्ष / सचिव, संस्थेचे संचालक/ प्राचार्य यांच्या शिक्क्या व स्वाक्षरीसह लेखी समंतीपत्र संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्याकडे दि.30/05/2014 पर्यंत सादर करावीत.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

---

पृष्ठांकन/तंशिस/प्राकाना/शैवि-१/२०१३-१४/ 299
दिनांक:- 28 JAN 2014

प्रति,
संचालक/प्राचार्य
पदवी व पदव्युत्तर पदवी तसेच तत्सम संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंबंधीची कार्यवाही उपरोक्त पत्राप्रमाणे करण्यांत यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.